स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम.ए., पीएच्‌ डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/३३३ **दि. ३१/१०/२०२६**

प्रति,

मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा

विषय : विशेष शिबिर Online प्रस्ताव भरणेबाबत... (सन २०२६–२७)

महोदय/महोदया,

दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रत्येक महाविद्यालय 'विशेष शिबीर दत्तक गाव योजना' राबवते. आणि ह्याअंतर्गत या गावात ७ दिवसीय विशेष शिबिर घेतले जाते. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ वर्षाकरिता महाराष्ट्रातील दुष्काळ सदृश्य परिस्थिती च्या पार्श्वभूमी मा. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार मा. राज्यसंपर्क अधिकारी कार्यालय यांनी पाठवलेल्या पत्रानुसार **'जलसंवर्धन : पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी वाचवा'** या विषयावर आधारीत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. महाविद्यालयांनी **My Bharat** पोर्टलवर रजीस्ट्रेशन करून **My Bharat** पोर्टलवर **Activity Event** तयार करून **Upload** करावेत. बॅनर, टीशर्ट, कार्यक्रम पत्रिकेवर सदर थीमचा उल्लेख करावा. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मा. जिल्हाधिकारी यांच्या शी संपर्क करून दुष्काळग्रस्त गावांमध्ये शिबीर घेण्याचे ठरविलेली आहे. या शिबिरामध्ये **'जलसंवर्धन : पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी वाचवा'** या विषयावरच काम करावे. पुर्वीची दत्तक गावे दुष्काळग्रस्त यादीत गाव नसेल तर सद्य स्थितीचा अभ्यास करून गाव बदलावे. यावर्षी केवळ दुष्काळग्रस्त गाव निवडावे. प्रत्येक महाविद्यालयाने शिबीरात केवळ जलसंधारणाची कामे करावी.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत दुष्काळ निवारण टास्क फोर्स स्थापन केले आहे. त्यांच्या निर्देशानुसार जलसंधारणची मोठे काम या काळात उभारावे. या संदर्भात विशेषतः महाविद्यालय आयोजित विशेष शिबिरांस, राष्ट्र/राज्य व विद्यापीठस्तरावरील वरिष्ठ अधिकारी, दुष्काळ निवारण विद्यापीठ टास्क फोर्स, जिल्हा/विभाग समन्वयक अनपेक्षितपणे भेट देणारच आहेत. सबब ग्रामीण शिबिरांचे नियोजन सकारात्मक व परिणामकारक करावे. त्या अनुषंगाने महाविद्यालयाने विशेष शिबिरादरम्यान वरीलप्रमाणे उपक्रमांसह गावस्तरावर वनराई बंधारे, नदी तलावातील गाळ काढणे, ओढे/नाले/नदी खोलीकरण दुरूस्ती, सीसीटी, शोष खड्डे/पाझर तलाव तयार करणे इत्यादी विशेष कार्यक्रम तसेच विद्यापीठाने ठरवून दिलेले उपक्रम आयोजित करावयाचे आहेत.

यावर्षी प्रत्येक रासेयो एककाने दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर ७ दिवशीय विशेष शिबिर ३१ डिसेंबर २०२६ पुर्वी आयोजित करणे आवश्यक आहे. विशेष शिबिरासाठीचे प्रत्येक रासेयो एककाकडून प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. हे प्रस्ताव **Online** पद्धतीने मागवण्यात येत असून **दि. ०५ नोव्हेंबर, २०२६** पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना एककांनी **Online** प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. ह्यासाठी **https://bcud.unipune.ac.in/** लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. **दि. ०५ नोव्हेंबर २०२६** नंतर शिबिर प्रस्ताव **Online** लिंक उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तरी निर्धारीत कालावधीमध्ये विशेष शिबिराचे संपूर्ण नियोजन करून प्रस्ताव भरण्यात यावे.

शिबिर कालावधीमध्ये सर्व शिबिरार्थी निवासी असतील याची काळजी घेण्यात यावी. श्रमदानाची व्यवस्था गावातील पदाधिकाऱ्यांशी व ग्रामस्थांशी बोलून निश्चित करावी. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

टिप : विशेष शिबिर प्रस्ताव विहित वेळेत ऑनलाईन सादर करावे.